१०) <u>महामंडळाच्या अधिकारी/कर्मचारी यांस मिळणारे वेतन व त्यांस भरपाई देण्यासंबधात नियमात असलेल्या तरतुदी.</u>

सर्वसाधारणपणे राज्य शासनाचे वेतन व भत्ते विषयक आदेश महामंडळात अंमलात आणले जातात.

पाचव्या वेतन आयोगा|च्या शिफारशी राज्य शासनाने स्वीकारल्यानंतर महामंडळातील पदांच्या वेतनश्रेणी त्या अनुषंगाने सुधारित करण्यात आलेल्या आहेत. महामंडळाच्या नियमित कर्मचारीवर्गाचे वेतन या सुधारित वेतनश्रेणीनुसार देण्यात येते.

प्रतिनियुक्तीने येणा-या अधिका-यांचे वेतन राज्यशासनाकडील त्यांची वेतनश्रेणी /वेतन त्यावरील अतिरिक्त वेतन (प्रतिनियुक्ती भत्त्याऐवजी ) यावर आधारित असते.

कंत्राटी स्वरुपात नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना एका ठोक रकमेचे वेतन ' मानधनाच्या ' स्वरुपात देण्यात येते.

महामंडळात सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनाचा तपशिल <u>सोबतच्या प्रपत्राप्रमाणे</u> आहे.